पिंपरी चिंचवड महानगरपालिका
**ग** प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ६
सभावृत्तांत

दिनांक - १/१/२०१८ वेळ - दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.०१/०१/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.श्री.अभिषेक गोविंद बारणे – सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.बारणे अर्चना तानाजी
५. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
६. मा.निलेश हिरामण बारणे
७. मा.सविता बाळकृष्ण खुळे
८. मा.सुनिता हेमंत तापकीर
९. मा.चंद्रकांत बारकु नखाते

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

**श्री.**श्रीनिवास दांगट- **क्षेत्रिय अधिकारी**/प्रशासन अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.ओंभासे पी एस – कार्यकारी अभियंता,श्री.मोमीन ए. ए – कनिष्ठ अभियंता, श्री.बोनगीर ए. एम – लेखाकारी, श्री.संदेश चव्हाण – कार्य.अभियंता विद्युत, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री.नितीन निंबाळकर , श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.आर.एम. बेद – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.साबळे बी आर- उपअभियंता, श्री.मोहिते एस एस – उपअभियंता जलनि:सारण, श्री.कलाल इ.के,श्री.कोरेवार एम बी, श्री.गजपुरे व्ही पी, श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.सतिष तायडे – विद्युत, श्री.बंडगर एस बी – जलनि:सारण, श्री.जी.एन.खैरे – उद्यान, श्री.बी.के.तापकीर - वृक्षसंवर्धन, श्री.संदिप मो.पाडवी – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.मोरमारे शरद – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.मगर एस एम – कनिष्ठ

अभियंता,श्री. मगर ए ए - क्रिडा पर्यवेक्षक ,श्री.कोळप एस. डी. - कार्यालय अधिक्षक(अतिक्रमण) इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

अ) दि. ०४/१२/२०१७ ची तहकुब (दि .११/१२/२०१७ ची सभा) चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. ५ ) कायम करणेत आला.

-------

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक- १

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा. निलेश बारणे अनुमोदक – मा. कैलास बारणे

संदर्भ – नगररचना व विकास विभाग यांचेकडील पत्र नरवि/कावि/६/थेरगाव/१२९९/२०१७ दि.२०/०९/२०१७ चे पत्र..

मौजे थेरगाव येथील रोजवुड हॉटेल ते थेरगाव गावठाण या २४.० मी रस्त्यापासुन उत्तरेकडील स.नं.२७ पासुन १२.० मी रस्ता नव्याने प्रस्तावित करुन सदर रस्ता आरक्षण क्र.६२७ पैकी प्राथमिक शाळा या आरक्षणास लागुन ३४.५० मी रस्ता ते स.नं.२६,२७,२८ व २९ या आरक्षणातील १२ मी रस्त्यापर्यंत नव्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत घोषित करणेबाबत मा. “ब” प्रभाग समितीने वरील संदर्भिय ठरावान्वये यापुर्वी मान्यता दिलेली आहे. सदरचे रस्ते घोषित करणेकामी मा.आयुक्त यांनी दि.२५/०४/२०१७ चे प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे, त्याअनुषंगाने सदर मौजे थेरगाव येथील रोजवुड हॉटेल ते थेरगाव गावठाण या २४.० मी रस्त्यापासुन उत्तरेकडील स.नं.२७ पासुन १२.० मी रस्ता नव्याने प्रस्तावित करुन सदर रस्ता आरक्षण क्र.६२७ पैकी प्राथमिक शाळा या आरक्षणास लागुन ३४.५० मी रस्ता ते स.नं.२६,२७,२८ व २९ या आरक्षणातील १२.० मी रस्त्यापर्यंत नव्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत घोषित करणेकामी नागरीकांच्या सुचना व हरकती मागविणेकामी दैनिक पुढारी, दैनिक सामना, दै.नवभारत, जाहिरात क्र.५७० यामध्ये दि.२६/५/२०१७ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर नोटीशीच्या अनुषंगाने ३० दिवसांचे विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही.

सदरचे रस्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अन्वये अंतिम घोषित करणेकामी सदर प्रस्तावास मा.ग प्रभाग समितीची अंतिम मंजुरी आवश्यक आहे. तरी प्रस्तुत रस्ते अंतिम घोषित करुन कायम करणेसाठी मा.ग प्रभाग समितीची मान्यता देणेस तसेच थेरगाव हद्दीपासुन थेरगाव वाकड या २४.० मी रस्त्यापर्यंतच्या ९.० मी/२४.० मी रस्ता प्रस्तावित करणेबाबत मा.ब प्रभाग समिती मंजुर ठ.क्र.७५, दि.२१/१२/२०१६ मध्ये थेरगाव येथील थेरगाव वाकड येथील N-E TO S-E २४.० रस्त्यापर्यंत २४.० मी.रस्ता प्रस्तावित करणे व N-E TO S-E २४.० रस्त्यापर्यंत ९.० मी रस्ता प्रस्तावित करणे या प्रमाणे नमुद करावा तसेच मौजे थेरगाव रोझवुड हॉटेल ते थेरगाव गावठाण या २४.० मी रस्त्यापासुन उत्तरेकडे स.नं. २७ मधुन श्री.भरत सोलंकी यांच्या ग्रँड कासा या गृहसंकुला पर्यंत १२.० मी

रुंदीचा नवीन रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत अंतिम घोषित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक- २

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.संदिप वाघेरे अनुमोदक – मा.चंद्रकांत नखाते

संदर्भ – मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १७/११/२०१७ चे पत्र..

मा.संदिप वाघेरे यांनी दिनांक १७/११/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील पवनेश्वर मंदिरासमोरील संडास ब्लॉक पाडण्यात आलेले आहेत. सदरचा परिसर ब्लॉक पडल्यामुळे अस्वच्छ झालेला आहे. त्यामुळे परिसरामध्ये दुर्गंधी पसरली आहे, त्यामुळे मंदिर परिसरामध्ये रोगराई पसरण्याची शक्यता वाढली आहे. सदर जागेमध्ये बहुउद्देशीय सभागृह बांधल्यास प्रभागातील नागरिकांना याचा लाभ घेता येईल. तरी सदर जागेमध्ये स्वानंद सुखनिवासी ह.भ.प.जोग महाराज यांचे नावे बहुउद्देशीय सभागृह बांधण्यात यावे. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक- ३

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.संदिप वाघेरे अनुमोदक – मा.सविता खुळे

संदर्भ – मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १७/११/२०१७ चे पत्र..

मा.संदिप वाघेरे यांनी दिनांक १७/११/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील आरोग्य विभागाचे ठेकेदार महापालिकेच्या नियम व अटींचे पालन न करता संबंधित ठेकेदार राजरोसपणे काम करीत आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टींचा प्रभागातील नागरिकांना त्रास होत आहे. त्यामुळे अशा सर्व ठेकेदारांवर कारवाई करुन त्यांना काळया यादीमध्ये टाकण्यात यावे, तसेच संबंधित ठेकेदारांनी सफाई कर्मचा-यांचे थकीत वेतन,किमान वेतन कायदा, भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा कायदा वा तत्सम कायदयांचे उल्लंघन केले असल्यास त्यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे व नवीन ठेकेदार नियुक्तीस मान्यता देण्यात यावी. तसेच साई चौक ते गेलोर्ड चौक व कराची चौक ते डिलक्स चौक शास्त्रीनगर इंदिरानगर परिसरामध्ये सायंकाळी स्वच्छता ठेवण्यासाठी कर्मचारी अथवा संस्था नेमण्यात याव्यात. तसेच प्रभागामध्ये कचरा वाहतुक करणा-या गाडया वाढविण्यात याव्यात. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक- ४

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा. निलेश बारणे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १७/११/२०१७ चे पत्र..

मा.संदिप वाघेरे यांनी दिनांक १७/११/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील नागरिकांच्या समस्या जाणुन घेणेसाठी प्रत्येक विभागाचे अधिकारी किमान २ तास प्रभागामध्ये असणे गरजेचे आहे त्याकरीता अशोक टॉकिज जवळ महिला व बाल विकास प्रकल्प दुमजली इमारत आहे. सदर

इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर स्थापत्य विषयक सुधारणा करुन प्रभाग सेंटर तसेच दुस-या मजल्यावर स्पर्धा परिक्षा केंद्र तयार करण्यात यावे. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक- ५

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा. संदिप वाघेरे अनुमोदक – मा.सविता खुळे

संदर्भ – मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १७/११/२०१७ चे पत्र..

मा.संदिप वाघेरे यांनी दिनांक १७/११/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये साथीचे आजार तसेच डेंगुच्या आजारावर नियंत्रण ठेवणेकामी फोगिंगची व्यवस्था त्वरीत सुरु करण्यात यावी. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक- ६

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा. सुनिता तापकीर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १७/११/२०१७ चे पत्र..

मा.संदिप वाघेरे यांनी दिनांक १७/११/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये मनपा इमारती, उद्याने, व्यापारी गाळे, पाण्याच्या टाक्या इत्यादींची संख्या मोठया प्रमाणावर आहे. परंतु काही ठिकाणी रखवालदार उपलब्ध नाहीत. त्यामुळे या सार्वजनिक मालमत्तेच्या गैरवापराची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन या ठिकाणी लवकरात लवकर रखवालदार नेमण्यात यावेत. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक- ७

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.संदिप वाघेरे अनुमोदक – मा.सविता खुळे

संदर्भ – मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १७/११/२०१७ चे पत्र..

मा.संदिप वाघेरे यांनी दिनांक १७/११/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये अनेक वर्षांपासुन वापरात नसलेले व्यापारी गाळे व मिळकती यांची संख्या जास्त आहे. सदर गाळे सद्यस्थीतीत बंद आहेत तरी ते गाळे पालिका भाडे तत्वावर देऊन उत्पन्नात वाढ करु शकते. तरी याबाबत विचार करावा. तसेच प्रभागामध्ये सभागृह, सांस्कृतिक केंद्र, रखवालदार साठी बांधण्यात आलेल्या रुम याचा गैरवापर होताना दिसत आहेत सदर जागेंची पाहणी क्षेत्रीय अधिका-यांमार्फत महिन्यातुन एकदा तपासणी करुन त्वरीत ताबा घेण्यात यावा व संबंधित व्यक्तीवर कारवाई करण्यात यावी. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक- ८

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा. संदिप वाघेरे अनुमोदक – मा.सविता खुळे

**संदर्भ –** मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १७/११/२०१७ चे पत्र..

मा. संदिप वाघेरे यांनी दिनांक १७/११/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील ज्येष्ठ नागरिक, शिक्षण संस्था, सामाजिक संस्था यांचे वतीने आधार कार्ड नोंदणी शिबीरासाठी मागणी होत आहे. प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, अपंग व्यक्ती यांना ग क्षेत्रीय कार्यालयामध्ये नोंदणी करण्यासाठी अडचणी निर्माण होत आहे. त्यांचेमार्फत वारंवार तक्रार दाखल होत आहे. तरी प्रभाग क्रमांक २१ मधील नागरी सुविधा केंद्र येथे महिन्यातुन एकदा आधार कार्ड नोंदणी शिबीर घेण्यात यावे. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक- ९

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा. संदिप वाघेरे अनुमोदक – मा.सविता खुळे

**संदर्भ –** मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १७/११/२०१७ चे पत्र..

मा. संदिप वाघेरे यांनी दिनांक १७/११/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये गेल्या काही दिवसापासुन मोकाट जनावरे व डुकरे त्याचप्रमाणे भटके कुत्रे याची संख्या खुप वाढली आहे. त्याचप्रमाणे प्रभागामध्ये पावसाळयामध्ये विषारी साप दिसण्याचे प्रकार आढळले आहे. तरी या संबंधी पशुवैद्यकिय विभागामार्फत प्रभाग स्तरावर उपाययोजना करण्यात यावी व प्रभाग स्तरावर सर्पमित्र व प्राणी मित्र यांचे मानधनावर लवकरात लवकर नेमणुक करण्यात यावी. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक - १०

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.संदिप वाघेरे अनुमोदक – मा.सविता खुळे

**संदर्भ –** मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १७/११/२०१७ चे पत्र..

मा.संदिप वाघेरे यांनी दिनांक १७/११/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये झाडांची संख्या मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. सदर झाडे हि धोकादायकरित्या वाढलेली आहेत. त्यामुळे प्रभागातील नागरिकांना त्रास होत आहे. यासंबंधी सदर अधिका-यांना विचारणा केली असता ते आवश्यक असलेली यंत्रणा कमी आहे (गाडी व लेबर) अशी उत्तरे देतात. तरी त्यासाठी प्रभाग स्तरावर आवश्यक ती उपाययोजना लवकरात लवकर करण्यात यावी. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक - ११

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.सविता खुळे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता,स्थापत्य ग क्षेत्रिय कार्यालय यांचे पत्र क्र. गक्षे/स्था/कावि/१५५/२०१७, दि.१५/१२/२०१७

कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.गक्षे/स्था/कावि/१५५/२०१७, दि.१५/१२/२०१७ नुसार मौजे रहाटणी गावठाण लगत मंजुर विकास योजनेव्यतिरीक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये ९.०० मीटर रुंद रस्ता अंतिम घोषित करणेबाबत मा.आयुक्त यांनी त्यांचेकडील पत्रान्वये विषयांकित प्रस्तावावर अंतिमत: कार्यवाही करणेकामी माहे जुन २००९ मध्ये पारीत केलेल्या ठरावावर मा.ड प्रभाग समितीची मान्यता मिळणेकामी विषय ठेवणेबाबत मा.ड क्षेत्रिय अधिकारी यांना कळविले आहे. परंतु नवीन क्षेत्रिय कार्यालयाच्या पुर्नरचनेनुसार रहाटणी प्रभाग क्र.२७ हा ग क्षेत्रिय कार्यालय अखत्यारीत येत असल्याने सदर मा.क्षेत्रिय अधिकारी, ड क्षेत्रिय कार्यालय यांनी संदर्भिय पत्र क्र.२ चे ग क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे वर्ग केले आहे. संदर्भिय पत्र क्र.२ मधील सदर प्रस्तावित रस्ता अंतिमत: घोषित करणेसाठी मा.ग क्षेत्रिय कार्यालय समितीची मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक - १२

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक – मा.निलेश बारणे

संदर्भ – मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक २१/१२/२०१७ चे पत्र..

मा.ग प्रभाग अध्यक्ष श्री.अभिषेक बारणे यांनी दिनांक २१/१२/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार,

१) ग प्रभाग समितीची मासिक मिटींग दरमहिन्याच्या पहिल्या सोमवारी दुपारी २ वाजता आयोजित करणेबाबत वेळ ठिकाण/ व वार निश्चीत केलेला आहे तरी ग प्रभाग समिती मासिक . सभा दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी सकाळी ११ वाजता घेणेस मान्यता देणेत येत आहे.

२) ग प्रभाग समितीची मासिक सभा ज्या दिवशी व वेळी भरविली जाते, त्या दिवशी सकाळी १० ते ११ या कालावधीत जनता दरबार भरविणेत येणे बाबतची कार्यवाही प्रायोगिक तत्वावर करणेबाबत चर्चा करण्यात आली.

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ग क्षेत्रिय कार्यालय दि. ९/०८/२०१७ पासुन नव्याने निर्मीत झाले असुन या कार्यालयाकडे मनपाच्या नागरी सुविधा देण्याचे कामकाज केले जाते . नवीन प्रभाग निर्माण झाल्यावर या प्रभागाचे उद्‌घाटन

झालेले नाही, तसेच नवीन कार्यालयाची या ठिकाणच्या नागरीकांना पाहिजे त्या प्रमाणात माहिती नाही त्यामुळे , नागरीकांच्या तक्रारी बाबत कोठे जावे याची माहिती नसल्याने सन्माननीय सदस्यांना त्यांच्या रोषास सामोरे जावे लागते. तरी नव्याने निर्माण झालेल्या ग क्षेत्रिय कार्यालयाच्या प्रभाग क्र. २१,२३,२४ व २७ या प्रभागातील नागरीकांना क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या संबंधित ,सर्व विभाग या- अधिकारी कर्मचारी यांची , माहिती व फोन नंबर उपलब्ध करुन देणेबाबत पुस्तिका छापुन सर्व प्रभागात वाटणेत यावी जेणे करुन लोकाभिमुख , प्रशासन संकल्पना अंमलात येईल व नागरीकांना मनपाच्या सर्व सुख सुविधा उपलब्ध करुन देणे व त्यांच्या तक्रारीचे निवारण करणे सोयीस्कर होईल. त्यानुसार येणा-या खर्चास व माहिती पुस्तिका छापणेबाबत मान्यता देणेकामी सदरचा विषय ग प्रभाग समिती सभेत ठेवणेत यावा सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे .

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक - १३

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.सुनिता तापकीर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अर्चना बारणे यांचे दिनांक २८/१२/२०१७ चे पत्र..

मा.अर्चना बारणे यांनी दिनांक २८/१२/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२३ मधील खालील विषयांना मंजुरी देणेबाबत..

१) माझ्या प्रभागात विविध भागातील परिसरामध्ये कॉलन्या, सोसायटया, नगर, चौक, मंदिरे, शाळा त्यांचे नामकरण फलक लावणे.

२) प्रभागातील ठराविक चौकात सि.सि.टीव्ही कॅमेरे बसविणे.

३) प्रभागातील नागरिकांसाठी बेंचेस बसविणे.

४) पुर्वी बसवण्यात आलेली वाचनालयाची नुतनीकरण करणे व नागरिकांसाठी वर्तमानपत्राची व्यवस्था करणे

५) शिवाजी महाराज पुतळा परिसर सुशोभिकरण करणे. ( सिमारेषा गेट)

६) गरज असेल तेथे रस्त्याला गतिरोधक (फायबर) टाकणे.

७) बापुजी बुवा उद्यानातील विद्युत पोल व लाईट फिटींग नुतनीकरण करणे.

८) प्रभाग क्र.२३ मध्ये जेष्ठ नागरिक (विरंगुळा केंद्र ) येथे वाचनालय करण्यात यावे.

९) कुणाल रेसिडन्सी येथे नाल्यावरती स्वच्छतागृह बांधण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - १४

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.संदीप वाघेरे

संदर्भ – मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक १/१/२०१८ चे पत्र..

मा.अभिषेक बारणे यांनी दिनांक १/०१/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार ग प्रभागामध्ये तळमजल्यावर नागरिकांना नागरी सुविधा पुरवण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्र, CSC सेंटर, नागरी सुविधा केंद्र, लाईट बिल भरणा केंद्र व संजय गांधी निराधार योजना साठी दोन स्वतंत्र केबिन देण्यात यावे यामुळे एकाच ठिकाणी सर्व सुविधा नागरिकांना उपलब्ध होतील. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - १५

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.संदिप वाघेरे

संदर्भ – मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक १/१/२०१८ चे पत्र..

मा.अभिषेक बारणे यांनी दिनांक १/१/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार आरक्षण क्र.६२८ वनदेव नगर, थेरगाव येथे मोकळे मैदान आहे. या ठिकाणी मैदानाची पुर्ण जागा मोकळी आहे. तरी त्या ठिकाणी मैदानाला गेट बसवण्यात आले आहे. तरी ते मैदान नागरिकांना खेळण्यासाठी मोकळे करण्यात यावे. तरी मैदानावर खुप राडारोडा पडलेला असुन तो पुर्ण उचलुन त्या ठिकाणी लाईटची व्यवस्था करुन नागरिकांना मोकळे करण्यास तसेच सदर मैदानामध्ये पुरुषांसाठी व महिलांसाठी वेगळे स्वच्छतागृह तयार करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - १६

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.संदिप वाघेरे

संदर्भ – मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक १/१/२०१८ चे पत्र..

मा.अभिषेक बारणे यांनी दिनांक १/०१/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार ग प्रभागामध्ये सर्वे नं.९ मधील दवाखाना शेजारील मोकळी जागा आहे, सदर जागे मध्ये खुप राडा रोडा व मुरुम पडलेला आहे. सदर जागेवर सर्व लेवल करुन पे आणि पार्किंगसाठी उपलब्ध करावी व ती जागा भाडेतत्वावर उपलब्ध करावी.

यामुळे महानगरपालिकेला उत्पन्न येईल, तरी याबाबत तातडीने भाडे तत्वावर देण्यात यावी. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक - १७

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.संदिप वाघेरे

संदर्भ – मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक १/१/२०१८ चे पत्र..

सर्वे नं.९ मधील आरोग्य कोठी शेजारील मोकळे मैदानाची जागा मोकळी आहे. तरी ते मैदान नागरिकांना खेळण्यासाठी मोकळे करण्यात यावे. सदर मैदानावर खुप राडा रोडा पडलेला असुन तो पुर्ण उचलणे, तसेच साईडला कंपाऊंड करणे व मैदानामध्ये लाईटची व्यवस्था करणे. तसेच सदर मैदानामध्ये पुरुषांसाठी व महिलांसाठी वेगळे स्वच्छतागृह तयार करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३१ विषय क्रमांक - १८

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.संदिप वाघेरे

संदर्भ – मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक १/१/२०१८ चे पत्र..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व उद्यान, डांगे चौक, थेरगाव येथे आहे. सदर उद्यानाचे मेन गेट जवळ मुख्य रस्त्यालगत पाणपोई तयार करण्यात येणार आहे. तरी त्या शेजारी ८ * ८ फुट मोजमापाची जागा उपलब्ध आहे. तरी ती जागा मनपा नियमानुसार ११ महिने भाडे तत्वावर अन्नपुर्णा योजनेसाठी उपलब्ध करुन द्यावी. सदर ठिकाणी अन्नपुर्णा योजनेसाठी संस्थेमार्फत अल्पशा दरात (१० रुपयात ) डाळ खिचडी वाटप करण्याचे नियोजन करणेस तसेच वनदेव आनंदवन मित्र मंडळासाठी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - १९

दिनांक- १/१/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक १/१/२०१८ चे पत्र..

मा.अभिषेक बारणे यांनी दिनांक १/०१/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, थेरगाव मधील विद्यार्थी, शिक्षक, पालिका कर्मचारी आणि नागरिक यांचे एकत्र मिळुन एकाच वेळी ध्वजारोहण व राष्ट्रगीत घेण्यात यावे. हा कार्यक्रम ग प्रभागाच्या दीड किलोमीटर अंतराच्या आवारामध्ये साजरा करण्यात येईल. यामध्ये साऊंड सिस्टम व शिवाजी पुतळयाच्या समोर एक स्टेज असायला हवे. सदर कार्यक्रम रोजवुड हॉटेल, थेरगाव फाटा पासुन ग प्रभागापर्यंत परेड करण्यात येईल. यामध्ये महानगरपालिकेतील शाळेचे विद्यार्थी व शिक्षक असतील. सदर कार्यक्रम पिंपरी चिंचवड

महानगरपालिका व थेरगाव डेव्हलपमेंट कमिटी यांचे विद्यमाने साजरा करण्यात येईल. याव्दारे नागरिकांपर्यंत एकात्मतेचा संदेश पोहचवणे हा उद्देश आहे. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

दि.१/१/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.

मा.अध्यक्ष यांनी सर्वांना नुतन वर्ष २०१८ च्या शुभेच्छा देवुन सभेस सुरुवात केली.

मा.अभिषेक बारणे – दर महिन्याच्या मासिक प्रभाग समिती सभेचे दिवशी सकाळी १० ते ११ या वेळेत जनता दरबार भरविणेचे विषयास प्रायोगिक तत्वावर मान्यता देणेत येत आहे. या सभेचे दरम्यान अधिकारी, नागरिक व नगरसेवक यांचा समावेश असेल. सदर सभेबाबत नागरिकांना माहिती देण्यात यावी.

मा.चंद्रकांत नखाते – संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी मिटींगला उपस्थित राहणे आवश्यक आहे. मिटींगला अनुपस्थीत राहणा-या अधिका-यांना नोटीस देणेत यावी. मिटींगमध्ये होणा-या ठरावानुसार काय कार्यवाही करण्यात आली याचे स्पष्टीकरण देणेत यावे. ड्रेनेज संदर्भात अनेक तक्रारी आहेत. १० ते १५ वर्षांपासुन टाकण्यात आलेल्या पाईपलाईन्स चोक अप होतात. त्यासंदर्भात १० ते १५ तक्रारी येतात. ठेकेदार केवळ लाईन्स हलवुन त्या चालु करुन देतात. वॉर्डमध्ये Suction चा उपयोग केला जात नाही. श्री.गट्टुवार साहेब कधी मिटींगला नव्हते, यानुसार पत्राप्रमाणे त्यांच्यावर कार्यवाही करावी. १० महिने झाले आम्ही निवडुन आलो. परंतु १० वर्षात ड्रेनेजलाईन स्वच्छ केलेली नाही. सदर यंत्रणा कशी राबविली जाते याचा खुलासा करावा.

श्री.मोहिते – ग प्रभागासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येईल. BVG आणि JD Enterprises Agency हे नवीन प्रभाग रचनेनुसार व्यवस्था करणार आहेत.

मा.चंद्रकांत नखाते – यासंदर्भात किती वेळा प्रस्ताव ठेवला? पत्रव्यवहार केला का? मनपाच्या टाक्यांमध्ये पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. पाच मीटर पाणी भरण्याऐवजी केवळ दीड मीटर पाणीपुरवठा होत आहे.

अतिक्रमण विभागाच्या काय अडचणी आहेत याबाबत त्यांनी लेखी स्वरुपात अडचणींची यादी द्यावी.

१) कामासाठी माणसे नाहीत
२) हातगाडी साठी १० माणसे हवी असतात.
याबाबत सर्व लेखी द्यावे.
अतिक्रमण विभाग - ६०० नोटीस वाटण्यात आल्या.

हातगाडया किती जमा करण्यात आल्या? हातगाडयांमुळे ट्रॅफिक वाढत चालले आहे. शिवाजी चौक ते रहाटणी फाटा या रस्त्यांवर अतिक्रमण कारवाई करा.

८ दिवस आधी नोटीस द्या. नंतर जप्ती करा.अतिक्रमण विभागाने कारवाई करावी.

मा.सुनिता तापकीर – कचरागाडी रोज का येत नाही. औषध फवारणी रेग्युलर केली जात नाही तसेच झाडुवाल्या प्रत्येक कॉलनीत जात नाही. अशा सर्व समस्यांचे निराकरण करा.

डी मार्ट समोरील भुयारी मार्गात सी सी टीव्ही कॅमेरे लावणेत यावे व सदर ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नेमणुक करण्यात यावी.

श्री.चव्हाण (कार्यकारी अभियंता,विद्युत) - सदर ठिकाणी सी सी टी व्ही कॅमेरे टेंडरची प्रोसेस झाली की बसविण्यात येतील.

- मोकाट जनावरे पकडण्यासाठी गाडी पाठविणेत यावी.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष
ग प्रभाग समिती
थेरगाव– ३३.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ १ /२०१८
दिनांक - १६ /०१/२०१८

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
क्षेत्रीय कार्यालय,
थेरगाव – ३३

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.